सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## ग्रामविकास विभाग, मंत्रालय,

## बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई-००१.

दूरध्वनी- (०२२) २२०७२०४१ ई-मेल-bandhkam5.rdd-mh@mah.gov.in

क्र. संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१५४/बांध-५ दिनांक-५ सप्टेंबर, २०२५

**प्रति,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, सर्व

**विषय:-** ग्रामीण भागातील ग्रामीण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते, ग्रामीण गाडीमार्ग, पायमार्ग, शेतावर जाण्याचे पायमार्ग/गाडीमार्ग या रस्त्यांचे सिमांकन करुन त्यांना विशिष्ट क्रमांक देणेबात निश्चित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्याबाबत.

**संदर्भ:-**१)महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.४५८/भूमापन (ल-१), दि.२९ ऑगस्ट, २०२५
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.मराअ-२०२५/प्र.क्र.६३(ई-ऑफिस क्र.१२९६३७८)/समन्वय-१, दि.२९ ऑगस्ट, २०२५

राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामीण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते, ग्रामीण गाडी मार्ग, पाय मार्ग, शेतावर जाण्याचे पायमार्ग व गाडी मार्ग, शेत पांदण रस्त्यांचे अभिलेख अद्यावत करणे, त्यावर असलेले अतिक्रमण हटवणे, रस्त्यांचे सिमांकन करणे, सदर रस्त्यांना विशिष्ट क्रमांक देणे याबाबतची कार्यपद्धती संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे. या कार्यपध्दतीनुसार ग्रामपंचायत/ग्रामपंचायत अधिकारी/गट विकास अधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी संबंधित कार्यवाही करण्याबाबत याद्वारे सुचित करण्यात येत आहे.

२. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांचा जन्मदिन दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दिनांक ०२ ऑक्टोंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीमध्ये "सेवा पंधरवाडा" राज्यभर राबविण्यात येणार असून सदर अभियानातील पहिल्या टप्प्यात पाणंद रस्ते विषयक मोहिम राबवावयाची आहे, असे संदर्भ क्र.२

येथील शासन निर्णयात नमूद केले आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने ग्रामपंचायत/ग्रामपंचायत अधिकारी/गट विकास अधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी संबंधित संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयात नमूद बाबींसंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना जि.प. स्तरावरुन निर्देश देण्यात यावेत.

(प्रशांत पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन